VOL- X ISSUE- I JANUARY 2023 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.367 ISSN 2349-638x

# शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादन, प्रेरणा व भावनिक बुध्दिमत्ता विकसनासाठीच्या कृतीकार्यक्रमाच्या परिणामकारकतेचा अभ्यास

संशोधक मार्गदर्शक
**प्रा.डॉ.हर्षानंद पं.खोब्रागडे**
शासकीय अध्यापक महाविदयालय,बुलडाणा.

संशोधक विदयार्थीनी
**कु स्नेहलकुमारी ज्ञानबा बोरकर.**

**सारांश**

*विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयी हया अयोग्य असतील तर त्यांना शैक्षणिक संपादन चांगले मिळविण्यासाठी खुप मेहनत करावी लागते. त्यासाठी विद्यार्थ्यांनी अध्यापनात प्रेरणायुक्त साधने वापरुन त्यामध्ये प्रलोभने द्यावी. जेणेकरुन विद्यार्थी उत्स्फुर्त होतील. त्यासाठी प्रलोभनांमुळे विद्यार्थ्यांचा सहभाग वाढतो व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास चांगला होतो त्यासाठीच आज विद्यार्थ्यांना चांगल्या शैक्षणिक संपादनासाठी चांगल्या प्रेरणायुक्त साधनांची आवश्यकता आहे. अध्यापन प्रभावी, अर्थबोधक, मनोरंजक होण्यासाठी दैनंदिन अध्यापनात प्रेरणायुक्त अध्यापनांचा वापर करणे गरजचे आहे.विद्यार्थ्यांचा शारिरीक, मानसिक व बौध्दिक विकास हा बुध्दिमत्तेच्या आधारे नैसर्गिकरित्या होत असतो. मुलांचा बौध्दिक विकास हा जन्मतः होण्यास सुरुवात होते व वयाच्या पाच वर्षापर्यंत जवळ-जवळ संपूर्ण बौध्दिक विकास हा झालेला असतो.कार्य करत असतांना बुध्दिमत्तेसोबत भाविनक बुध्दिमत्तेची देखील जोड असेल तर ते कार्य उत्कष्ठ होण्याची संभावना अधिक असते. आणि ज्यांचा भावना व बुध्दिमत्तेचा विकास झालेला आहे ते व्यक्ती इतर व्यक्तींच्या तुलनेत सुखी व समाधानी असतात. त्यांच्या कामाचा दर्जा उंचावलेला असल्याचे दिसून येते.विद्यार्थ्यांमध्ये भावनिक बुध्दिमत्ता किती प्रमाणात विकसित झाली आहे, हे पाहण्यासाठी व भावनिक बुध्दिमत्तेला आणखी वाव मिळण्यासाठी यांची गरज आहे. शैक्षणिक संपादन हा घटक प्रत्येक विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्वाचा घटक आहे. शैक्षणिक संपादनामुळे विद्यार्थ्यांतील आत्मविश्वास वाढीस लागतो व कार्य करण्याचे धाडस वाढते.*

**शैक्षणिक संपादन :-**

शैक्षणिक संपादनात विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेची चाचपणी केली जाते. तो विद्यार्थ्यांमधील अपेक्षित वर्तन बदल असतो. सदर बदल हा गुणात वा भाषेत वर्णन केलेली बाब असते. शैक्षणिक संपादनात आशय प्रभुत्वाबद्दल बदलाबरोबरच भावनिक बदल, जीवन कौशल्यावरील बदल इ. बाबी विचारात घेतल्या जातात. विद्यार्थी, शिक्षक, पालक, समाज, साहित्य, सरकारी धोरणे आणि यंत्रणा अशा कारक घटकांचा हेतुपूर्ण वा सहज घडणा-या परस्पर आंतरक्रियांचा परिणाम म्हणजे शैक्षणिक संपादन होय. शैक्षणिक संपादनासाठी विद्यार्थ्यांचे अध्ययन घडणे म्हत्वाचे असते.

**प्रेरणा :**

साध्य गाठण्यास प्रवृत करणा-या विशिष्ट दिशेने वाटचाल करावयास लावणा-या वर्तनासाठी उत्साह टिकवून धरणा-या शक्तीचे मिश्रण म्हणजे प्रेरणा होय.

विद्यार्थ्यांना अध्यापनामध्ये प्रेरणा निर्माण करण्यासाठी वेगवेगळया साधनांचा उपयोग करावा लागतो ते खालीलप्रमाणे

**शैक्षणिक साधने :-**

१) सहशालेय साधने
२) सृजनशीलता
३) शाबासकी
४) बक्षिसे

अध्यापनामध्ये आपण ज्या विविध साधनांचा उपयोग करतो त्याला शैक्षणिक साधने असे म्हणतात. मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून शिक्षणाचा नवीन विचार समोर आला. अध्यापनात वापरण्यात येणा-या शैक्षणिक साधनांच्या वापराने आणि सहशालेय उपक्रमांद्वारे ज्ञानेद्रीयांना चालना मिळते. अध्ययन हे दिर्घकाळ टिकण्यास मदत मिळते विद्यार्थी अधिक क्रीयाशील कृतिशील होऊन विचारांना चालना मिळते.

**भावना :-**

मनवी वर्तनात उद्दिपकाबरोबरच भावनेलाही महत्व आहे. भावना आपल्या वर्तनाचे आणि मानसिक प्रक्रियांचे एक महत्वाचे अंग आहे. भावनांचा अनुभव आला नाही. अशी व्यक्ती शोधूनही सापडणार नाही. भावना तसेच भावनांची तीव्रता प्रत्येकाच्या ठिकाणी कमी-जास्त असते. त्यामुळे व्यक्तीला जीवन जगावेसे वाटते. भावनाशिवाय व्यक्तीचे जीवन रुक्ष व नीरस होते. एखादयाच्या वाटयाला सतत दुःखाची भावना आणि निराशा आल्यास जीवन जगणे असहय होते. आनंद, सुख, समृध्दी, दुःख, आशा, प्रसन्नता, राग, प्रेम, द्वेष, भीती, लोभ, प्रिती इ. भावनांचा अनुभव कमी-जास्त प्रमाणात प्रत्येकाने घेतलेला असतो भावनांमुळे व्यक्ती वर्तनात जिवंतपणा विविधता आणि गतिमानता येते.

**भावनिक बुध्दिमत्ता :-**

उच्च बुध्दांक असलेल्या व्यक्तीच्या जीवनातील यशस्वीतेचा अभ्यास करतांना असे आढळून आले की, त्यांच्यापैकी २०ः व्यक्तीच जीवनात सुखी, समाधानी आहे. तर ८०ः व्यक्तीच्या बाबतीत सुखी, समाधानी, यशस्वी आयुष्याची भावना कमी आढळली की, त्या व्यक्ती बुध्दिमत्तेसोबत सर्वसामान्य किंवा त्यापेक्षा थोडया कमी बुध्दिमत्तेच्या आहेत. या जीवनात यशस्वी झाल्या आहेत, यावरुन असा निष्कर्ष काढण्यात आला की, जीवनात यशस्वी होण्यासाठी पारंपारीक पध्दतीने मापन केली गेलेली बुध्दिमत्ताच पुरेशी नसून त्याला भावनिक बुध्दिमत्तेची जोड असणे गरजेचे आहे.

**शोध निबंधाचे शीर्षक :**

शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादन, प्रेरणा व भावनिक बुध्दिमत्ता विकसनासाठीच्या कृतीकार्यक्रमाच्या परिणामकारकतेचा अभ्यास.

**शोध निबंधाची उद्दिष्टेः**

प्रस्तुत शोध निबंधाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे :

१. शालेय विद्यार्थ्यांच्या संदर्भात शैक्षणिक संपादन, प्रेरणा व भावनिक बुध्दिमत्ता या संकल्पनेचा अभ्यास करणे.
२. शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनाचे मापन करणे.
३. शालेय विद्यार्थ्यांच्या प्रेरणेचे मापन करणे.
४. शालेय विद्यार्थ्यांच्या भावनिक बुध्दिमत्तेचे मापन करणे.
५. शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादन, प्रेरणा व भावनिक बुध्दिमत्ता विकसनासाठी कृती कार्यक्रम तयार करणे.
६. शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादन, प्रेरणा व भावनिक बुध्दिमत्ता विकसनासाठी तयार केलेल्या कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे.
७. शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादन, प्रेरणा व भावनिक बुध्दिमत्ता विकसनासाठी कृती कार्यक्रमाची परिणामकारकता अभ्यासणे.

**शोध निबंधाची व्याप्ती व मर्यादा :**

१) प्रस्तुत संशोधनात शैक्षणिक संपादन, प्रेरणा व भावनिक बुध्दिमत्ता या संकल्पनेचा समावेश करण्यात आला

२) प्रस्तुत संशोधनात शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादन, प्रेरणा व भावनिक बुध्दिमत्ता विकसनासाठी कृती कार्यक्रमाची परिणामकारकतेचा अभ्यास करण्यात आला आहे.

**शोध निबंध संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोध निबंध संशोधन हे भविष्यकाळाशी संबंधीत असल्यामुळे प्रायोगीक पध्दतीची निवड केली आहे.

**शोध निबंध नमुना निवड :**

प्रस्तुत संशोधनासाठी सुगम यादृच्छिक न्यादर्श पध्दतीने ५० विदयार्थ्याची निवड करण्यात आली आहे.

**शोध निबंध संशोधनाची साधने** :

प्रस्तुत संशोधनासाठी चाचणीचा संशोधन साधन म्हणून उपयोग करण्यात आला आहे.

**शोध निबंध संख्याशास्त्रीय तंत्र :**

प्रस्तुत संशोधनामध्ये माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यासाठी ष्जष मूल्य या सांख्यिकीय तंत्राचा वापर करण्यात आला आहे.

**शोध निबंध निष्कर्ष व शिफारशी**

१.शिक्षणाचे अंतिम उदिष्ट व्यक्तिमत्व विकास होय. हा विकास भावनात्मक, बोधात्मक, क्रियात्मक या तीनही उदिष्टांमार्फत साधला जातो.

२.विद्यार्थ्यांच्या बौध्दिक विकासासोबतच शारीरिक विकासही वाढीस लागणे महत्वाचे आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकासासाठी किंवा सर्वांगीण विकास प्रेरणा देणे आवश्यक आहे.

३.विविध प्रकारचे प्रलोभन बक्षिसे, शाबासकी देऊन विद्यार्थ्यांना शैक्षणिक संपादनामध्ये भर पाडू शकतो. प्रेरणायुक्त अध्यापनामुळे विद्यार्थ्यांची विविध विषयातील गोडी वाढण्यास मदत होते. विद्यार्थी कृतिशील होतात. तसेच त्यांच्यामध्ये आत्मविश्वास वाढीस लागते. विद्यार्थ्यांना शाळेविषयी आवड निर्माण होण्यास मदत होते.

४.अभ्यासाचे ओझे वाटू नये यासाठी अध्यापनामध्ये प्रेरणायुक्त अध्यापन केल्यास अध्यापन हे मनोरंजक होऊन विद्यार्थ्याचा व्यक्तिमत्व विकासावर योग्य परिणाम होतो. विद्यार्थ्यांची भावनिक बुध्दिमत्ता व प्रेरणा मापन केल्यानंतर येणा-या शैक्षणिक संपादन निष्कर्षावरुन जीवनातील महत्वाच्या पुढच्या इयत्तेत त्याची शैक्षणिक प्रगती साधण्यास मदत होईल.

५.विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादन विकासास भावनिक बुध्दिमत्ता व प्रेरणा पोषक ठरणारे घटक आहे. यांचा विकास विद्यार्थ्यांत जेवढा जास्त होईल तेवढी विद्यार्थ्यांची प्रगती वाढत जाईल.

६.विद्यार्थ्यांच्या आंतरीक शक्तीचा विकास होईल. विद्यार्थ्यांच्या प्रगतीस चालना मिळेल.

७.विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकासास पोषक असणा-या आत्मविश्वासाची वृध्दी होईल व स्वसन्माद्वारे स्पर्धात्मक युगात सक्षमतेने सामोरे जाण्यात मदत होईल.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

1.अब्राहम, आर. (2005). कामाच्या ठिकाणी भावनिक बुद्धिमत्ता: एक पुनरावलोकन आणि संश्लेषण.

2.ऑस्टिन, E.J., & Saklofske, D. H. (2005). खूप जास्त बुद्धिमत्ता? सामाजिक, व्यावहारिक आणि भावनिक बुद्धिमत्तेमधील सांप्रदायिकता.

3.बर्न्स, एन.आर., बास्टियन, व्ही.ए., आणि नेटेलबेक, टी. (2007). भावनिक बुद्धिमत्ता: व्यक्तिमत्व आणि संज्ञानात्मक क्षमतेपेक्षा अधिक?

4.कारुसो, डी. (2008). भावना आणि भावनिक बुद्धिमत्तेची क्षमता मॉडेल.

5.जॉर्डन, पी. जे. (2007). कामावर भावनिक बुद्धिमत्ता: संशोधनाचे पुनरावलोकन.

6.ग्लेंडन, बी.एम. थॉम्पसन आणि बी. मायर्स (एड्स.), संघटनात्मक मानसशास्त्रातील प्रगती.